## <u>नियमित फौजदारी खटला क्र. २२/२०२४ वरील निशाणी क्र. २८ वर आदेश</u>

प्रस्तुत अर्ज आरोपी क्र. १ ते ३ यांनी त्यांच्याविरूध्द केलेल्या इश्यु प्रोसेसच्या आदेशाचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २०४ अन्वये पुर्नविचार करण्याकरिता दाखल केला आहे.

**२.** आरोपी क्र. १ ते ३ यांचे असे कथन आहे की, फिर्यादीने त्यांचेविरूध्द भारतीय दंड विधान कायदा कलम ४०६, ४२०, ४६५, ४६८, ४७१ सह ३४ अन्वये फिर्याद दाखल केली आहे. दिनांक २६.०३.२०२४ रोजी सदर फिर्यादवरून आरोपींविरूध्द इश्यु प्रोसेसचा आदेश पारित करण्यात आलेला आहे. परंतु, फिर्यादीने दाखल केलेल्या कागदपत्रावरून फिर्यादीची आई शकुंतला ही आरोपी क्र. १ ते ३ यांची नातेवाईक असल्याचे दिसुन येत नाही. तसेच फिर्यादीची आई शकुंतला ही आरोपी क्र. १ चे सासरे व आरोपी क्र. २ व ३ यांचे आजोबा पुनाजी मेश्राम यांची मुलगी असल्याचे दिसुन येत नाही. पुना मेश्राम हा सन १९८० मध्ये मरण पावला आहे. त्याप्रमाणे त्याचे वारसांच्या नावे मिळकती झालेल्या आहे. आरोपी क्र. २ व ३ यांचा त्यावेळी जन्म झालेला नव्हता. फिर्यादीची आई पुना मेश्रामची वारस असल्याबाबत कोणताही पुरावा अभिलेखावर दाखल केलेला नाही. फिर्यादीने केवळ आरोपींची जमीन हडपण्याकरिता प्रस्तुत खोटी फिर्याद दाखल केली आहे. प्रस्तुत प्रकरण हे दिवाणी स्वरूपाचे असल्याचे दिसुन येते. त्यामुळे आरोपींविरूध्द फौजदारी प्रक्रिया प्रमाणे प्रस्तुत प्रकरण चालविता येणार नाही. फिर्यादीने दिनांक १३.१०.१९७३ त्याच्या जन्मापासुन ते प्रस्तुत प्रकरण दाखल करण्यापर्यंत त्याची आई शकुंतला ही पुना मेश्रामची वारस असल्याबाबत कोणतीही कार्यवाही केली नाही. फिर्यादी भिस्त ठेवत असलेल्या दस्तामध्ये तफावत दिसुन येत आहे. त्यामुळे प्रस्तुतचे प्रकरण आरोपींविरूध्द चालु शकत नाही म्हणुन आरोपींनी दिनांक २६.०३.२०२४ रोजीचा त्यांच्याविरूध्द झालेल्या आदेशाचा पुर्नविचार करून प्रस्तुतची फिर्याद फेटाळण्याची विनंती केली आहे.

**३.** फिर्यादीने त्याचे म्हणने दाखल करून आरोपींचे कथन नाकारले आहे. पुढे फिर्यादीने असे कथन केले आहे की, न्यायालयाने फिर्यादी व त्याचे साक्षदारांना फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २०० अन्वये सत्यापन नोंदवुन त्यानंतर आरोपींविरूध्द गुन्हयाची दखल घेवुन त्यांचेविरूध्द इश्यु प्रोसेसचा आदेश पारित केलेला आहे. प्रस्तुत प्रकरण गुण दोषावर चालवल्यानंतरच आरोपींनी गुन्हा केला किंवा नाही हे सिध्द होईल. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज सध्यस्थितीमध्ये मेन्टेनेबल नाही. सबब, प्रस्तुत अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली आहे.

४.	फिर्यादी व आरोपी यांच्या विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेख पडताळले असता असे दिसुन येते की, प्रस्तुत प्रकरण हे फिर्यादीने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १५६ (३) अन्वये दाखल केलेले होते. मात्र दिनांक २२.०५.२०२३ रोजी पुर्वपिठासीन अधिकारी यांनी फिर्यादीचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १५६ (३) अन्वयेची विनंती रद्द करून प्रकरण फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २०० अन्वये फिर्यादी व साक्षीदारांचे सत्यापन नोंदवण्याचा आदेश पारित केलेला आहे. त्याप्रमाणे फिर्यादी व साक्षीदार यांचे सत्यापन नोंदवलेले आहे. त्यानंतर दिनांक २६.०३.२०२४ रोजी फिर्यादी व साक्षीदारांचे अवलोकन करून आरोपी क्र. १ ते ३ विरूध्द भारतीय दंड विधान कायदा कलम ४०६, ४२०, ४६५, ४६८, ४७१ सह ३४ अन्वये इश्यु प्रोसेसचा फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २०४ अन्वये आदेश पारित केलेला आहे. फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २०४ अन्वये केलेला आदेश हा चाप्टर २० प्रमाणे प्रकरणाची प्रथम पायरी आहे. सदर आदेश हा अंतरिम आदेश आहे. न्यायदंडाधिकारी कोर्टाने आदेशित केलेल्या इश्यु प्रोसेसचा आदेश पुन्हा सारख्याच न्यायदंडाधिकारी कोर्टाने (Same Court) पुर्नविचारीत करण्याकरिता फौजदारी प्रक्रिया संहिताप्रमाणे तशी कोणतीही तरतुद नाही. सदर अंतरिम आदेश हा न्यायदंडाधिका—याने रिव्हयु अथवा रिकन्सीडर (Reviewed or reconsidered) करता येते नाही. सदर पुर्नविचाराची कोणतीही तरतुद फौजदारी प्रक्रिया संहितेमध्ये नसल्यामुळे आरोपी क्र. १ ते ३ यांचा प्रस्तुत अर्ज नामंजुर करण्यास पात्र आहे. सबब, आदेश पारित करण्यात येतो.

## <u>आदेश</u>

प्रस्तुतचा अर्ज नामंजुर करण्यात येतो.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by PRIYANKA MACHINDRA KAJALE
Date: 2025.07.31 17:34:52 +0530

**सडक अर्जुनी**
**दिनांक : ३१.०७.२०२५**

**( पी. एम. काजळे )**
**न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,**
**सडक अर्जुनी.**